# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

# औरंगाबाद 431004.

## मराठी भाषा व वाङ्मय विभाग

## पदव्युत्तर प्रवेश परीक्षा अभ्यासक्रम

## विषय : मराठी

## शैक्षणिक वर्ष ; 2019 - 2020

# पदव्युत्तर प्रवेश परीक्षा (CET Examination)

## अभ्यासक्रम

### 1. मराठी वाङ्मयेतिहास (प्रारंभ ते 2000)

### 1.1 मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (आरंभ ते 1818)

- मराठीतील धर्मसंप्रदायांची कामगिरी.
- नाथ, महानुभाव, वारकरी, समर्थ, दत्त या पंथ संप्रदायांचे तत्त्वज्ञान.
- वरील संप्रदायांमधील ग्रंथकार - कवी यांचे वाङ्मयमीन कर्तृत्व.
- मध्ययुगीन वाङ्मयनिर्मितीच्या प्रेरणा व तत्कालीन वितरण माध्यमे.
- पंडिती काव्यपरंपरा, शाहिरी काव्यपरंपरा व बखरवाङ्मय.
- शाहिरी काव्याचे स्वरुप, प्रेरणा व वैशिष्टये (पोवाडे, लावण्या इ. काव्यप्रकार).
- बखर वाङ्मय : बखरीचे विविध प्रकार, प्रेरणा, स्वरुप व वैशिष्टये.

### 1.2 आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (1818 ते 2000)

- आंग्लकालीन मुद्रणयुग, मराठी साहित्यातील बदल, भाषांतरित वाङ्मय व वृत्तपत्रे - मासिके - नियतकालिके यांची कामगिरी.
- कविता, कथा, कादंबरी, नाटक व चरित्र - आत्मचरित्र, आत्मकथन, निबंध, लघुनिबंध आणि समीक्षा इ. वाङ्मयप्रकाराचे स्वरुप - विशेष आणि विकास.
- साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाह : ग्रामीण, दलित, स्त्रीवादी , आदिवासी : या प्रवाहांच्या प्रेरणा, स्वरुप विशेष व आजवर झालेली वाटचाल आणि या प्रवाहातील महत्त्वपूर्ण वाङ्मयनिर्मिती या विषयीचा अभ्यास. मराठवाडयातील आधुनिक साहित्य मराठवाडयातील साहित्याचे वेगळेपण, त्यातील प्रादेशिकतेचे संदर्भ आणि या साहित्याचे स्वरुप व वैशिष्टये प्रेरणा आणि मराठवाडयातील विविध साहित्य चळवळींचा अभ्यास.

## 2. साहित्यशास्त्र व साहित्यसमीक्षा

### 2.1 सैध्दान्तिक व तात्विक भूमिका

- भारतीय साहित्यशास्त्र : यातील प्रयोजनविचार / रस, अलंकार, रीती, वक्रोक्ती, ध्वनी इ. सिध्दान्ताचे स्वरुप / भारतीय मीमांसक / भारतीय साहित्यशास्त्रातील वस्तुनिष्ठता आणि समीक्षेसाठी या साहित्यशास्त्राचा विचार कितपत उपयुक्त आहे याची चर्चा.

### 2.2 पाश्चात्य साहित्यशास्त्र

- प्रयोजनविचार / पाश्चातय व भारतीय साहित्यशास्त्राचे स्वरुप.
- साहित्य व समीक्षा परस्परसंबंध, समीक्षेचे स्वरुप व व्याप्ती.
- वाङ्मयमूल्ये व जीवनमूल्ये यांची परस्परपूरकता.

## 3. भाषाविज्ञान

### 3.1 भाषेचे स्वरुप, महत्त्व / भाषाभ्यासाच्या पध्दती :

भाषेची लक्षणे, भाषा व संदेशन, भाषाभ्यासाच्या परंपरागत पध्दती, ऐतिहासिक व वर्णनात्मक भाषाभ्यास पध्दती.

- स्वनविचार - स्वनविज्ञानाचे स्वरुप, वागेंद्रियांची रचना व कार्य, स्वननिर्मिती, स्वनांचे वर्गीकरण, स्वन - स्वनिम - स्वनांतर, खंडात्मक आाणि खंडाधिष्ठित स्वनिम.
- पदविचार (रुपविचार) - भाषेतील दुहेरी संरचना, रुप - रुपिका - रुपिकांतर स्वरुप, रुपिम आणि रुपिकांतर, रुपिमा व रुपिका यांचे प्रकार इ.
- वाक्यविचार - वाक्याचा वर्णनात्मक अभ्यास, वाक्य : शब्द आणि रुपिम, मुक्त आणि बध्द रुपिम, शब्दयोगी आणि प्रत्यय, रुपिकांचे वर्गीकरण, आशयसूचक रुपिमे, कार्यसूचक रुपिम, नामे आणि विभक्ती, वाक्याचा प्रत्याकृतीबंध, नियम.
- अर्थविचार - अर्थसिध्दान्त, अर्थाचे प्रकार, रुप - अर्थ संबंध आणि अर्थ - अर्थ संबंध, अर्थक्षेत्र कल्पना किंवा शब्दक्षेत्र कल्पना, अर्थविन्यास.
- सरंचनावाद - अमेरिकन आणि युरोपीयन.

### 3.2 मराठी भाषेची पूर्वपीठिका

मराठी भाषा आणि महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्राची भाषिक स्थिती, महाराष्ट्र : भाषिक आणि राजकीय, मराठीच्या जनकभाषा : मतमतांतरे, नवभाषनिर्मितीची कारणे व स्वरुप, मराठीच्या निर्मितीत इतर भाषांचे योगदान.

- मराठी भाषेची उत्पत्ती - मराठीचा उगमकाल, कोरीव लेख, ताम्रपट, मराठी ग्रंथलेखन.
- मराठीचे कालिक भेद - कालविभागणीचे विविध प्रकार, आदिकालातील मराठी, मध्यकालातील मराठी, आंग्लकालीन मराठी, आधुनिककालीन मराठी.
- मराठी भाषेवरील अन्य भाषांचा प्रभाव - सहवर्ती भाषांचा प्रभाव, याशिवाय फार्सी, संस्कृत, कन्नड, इंग्रजी व मराठी यांचा सहसंबंध.
- मराठीच्या बोली - भाषा आणि बोली साम्यभेद, मराठी व कोकणी / अहिराणी / वऱ्हाडी / डांगी / नागपूरी इ.
- मराठी भाषेच्या अभ्यासपध्दती.
- समाजभाषाविज्ञान : स्वरुप आणि व्याप्ती.
- सामाजिक बोलीविज्ञान.

### 4. मराठी व्याकरण व लेखनविषयक नियम

- मराठी व्याकरणाचा इतिहास, व्याकरणाचे प्रकार
- मराठीतील वर्ण, शब्द व वाक्यविचार
- मराठी व्याकरणातील संधी प्रयोग, समास, लिंग
- मराठीतील व्याकरणविषयक चिंतन
- विभक्ती व आखातविचार
- मराठी लेखनविषयक नियम

### 5. वाङ्मयीन प्रवाहांचा अभ्यास

- दलित साहित्य : संकल्पना, स्वरुप व प्रेरणा आणि इतिहास, दलित चळवळ
- आदिवासी साहित्य : समाज, संस्कृती, इतिहास, लोककला, बोली
- ग्रामीण साहित्य : स्वरुप व व्याप्ती, कालखंडानुसार झालेले बदल, ग्रामीण साहित्य चळवळ
- स्त्रीवादी साहित्य : स्त्रियांची स्थितीगती, समाजसुधारकांच्या चळवळी, स्त्रीवादी साहित्याचे स्वरुप, स्त्रीवादी साहित्याची भूमिका.

### 6. मराठी साहित्यक्षेत्रातील तात्कालिक वाङ्मयीन घडामोडी आणि घटना.

- मराठी साहित्य संमेलनाचा इतिहास व वाङ्मयीन पुरस्कार.